Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

UGC Approved Monthly Journal

VOL-IV ISSUE-X Oct. 2017

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# व्यंकटेश माडगूळकरांच्या कथांमधील दलित पात्रांची आदर्शमूल्ये

**प्रा.डॉ. लहू वाघमारे**
मराठी विभाग,
शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव
ता. चाकूर, जि. लातूर.

व्यंकटेश माडगूळकर यांनी दलित जीवनातील विविध पैलूंवर प्रकाश टाकला आहे. दलितांची शिकारीवृत्ती, सहनशीलता, अस्पृश्यता, सोशीकता, त्यांचे दु:ख, दैन्य, दारिद्र्य त्यांच्यातील गुन्हेगारी प्रवृत्ती, त्यांची लोककला या विविध वृत्ती-प्रवृत्तींचे चित्रण विविध कथांमधून आले आहे. त्याचबरोबर दलितांतील सज्जनपणा, प्रामाणिकता, नैतिकता आणि त्यांची आध्यात्मिकता या त्यांच्यातील अनेक आदर्शमूल्यांचेही चित्रण विविध कथांतील काही पात्रचित्रणातून लेखकांनी घडविले आहे.

'धर्मा रामोशी' या दलित कथेमधून दलितांचा प्रामाणिकपणा व्यक्त होतो. धर्मा रामोशी हा निवेदकाच्या घरची अनेक कामे करतो. एकदा सांगोल्याहून गावी जात असताना रात्रीच्या वेळी निवेदक, त्यांची आई आणि वडील जात होते. त्यांच्यासोबत धर्मा होता. निवेदकाच्या भावाला घेऊन आई घोड्यावर बसून जाते, तर निवेदकाचे वडील आणि धर्मा पायी चालतात. दिवेलागणीला ते घरी जातात. घरी गेल्यावर निवेदकाच्या आईच्या डोक्यातील सोन्याचे फूल गळून पडल्याचे लक्षात येते. तेव्हा धर्मा जेवणही न करता या वाटेने परत जातो आणि चांदणी उगवायच्या आत फूल घेऊन परत येतो. या प्रसंगातून धर्माचा प्रामाणिकपणा व सज्जनपणा व्यक्त होतो. धर्मा दरिद्री आहे, त्याला अन्न, वस्त्र आणि निवारा मिळत नाही, तरीही सोन्याचे फूल पाहून त्याची नैतिकता ढळत नाही. दारिद्र्य व भूक या समस्या असल्या तरीही धर्मा आपल्या मूल्यांपासून ढळत नाही. त्याची गरिबी, दारिद्र्य या प्रामाणिकपणाच्या आड येत नाहीत. धर्मा रामोशाच्या प्रामाणिकपणाचे व मूल्यात्मक जगण्याचे दर्शन प्रस्तुत कथेतून घडते. दलितांच्या सज्जनपणाचे दर्शन व्यंकटेश माडगूळकरांच्या 'देवा सटवा महार' या कथेतूनही घडते. देवा अस्पृश्य असून तो गावकामगार आहे; परंतु तो काही मूल्ये घेऊन जगतो. आपल्या गावकीच्या कामात तो कुचराई करीत नाही.

गावातील गावकीची व सवर्णांची वैयक्तिक कामे तो अत्यंत प्रामाणिकपणे करतो. इतर महाराप्रमाणे मुर्दाडपणा व आगाऊपणा त्याच्यात नव्हता. ''गावचा व्याप सांभाळून सरकारी कामातही कधी कुचराई होऊ देऊ नये. दासवृत्तीला अखंड जागावे, असा त्याचा बाणा.''[१] तो दासवृत्तीला जागून आपले कार्य प्रामाणिकपणे करतो. महार समाजातील इतर व्यक्तींपेक्षा देवा हा सज्जन आहे. त्याच्या सज्जनपणाचे चित्रण या कथेतून आले आहे. दलितांच्या सज्जनपणाबरोबरच दलित समाजातील व्यक्तींची आध्यात्मिकता व त्यांच्या भक्तिविषयक आचरणाचे दर्शन काही कथांमधून घडते. ग्रामीण भागातील दलित समाज हा हिंदू धर्माच्या प्रभावाखाली असल्यामुळे हिंदू धर्मातील देवविषयक श्रध्दांचा आणि आध्यात्माचा पगडा त्यांच्याही मनावर आहे. म्हणून दलित समाजातील काही व्यक्ती हिंदू धर्मातील दैवतांचे व देवांचे भक्त आहेत व ते या देवांची मनोभावे भक्ती करतात. व्यंकटेश माडगूळकरांनी आपल्या काही कथांमधून काही दलित व्यक्तींच्या चित्रणातून दलित समाजाच्या आध्यात्मिकतेचे व भक्तीचे चित्रण प्रातिनिधिक रूपात केले आहे.

'देवा सटवा महार' या कथेतील देवा हा दलित अस्पृश्य महार जातीचा असून तो भाविक आहे. तो आध्यात्मिक जीवन जगतो. त्याची देवावर व धर्मावर निष्ठा आहे. म्हणूनच तो सज्जनही आहे. ''तो प्रत्येक गुरुवारी उपवास करी. सकाळपासून संध्याकाळपर्यंत तो तोंडात काही घालत नसे.''[२] असे त्याचे वर्तन अत्यंत श्रध्दामय, भक्तीमय आणि शुध्द असे आहे. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिचित्रणातून मांगल्य व पवित्रतेचा प्रत्यय येतो, दलित समाज हा अशिक्षित, अडाणी असल्यामुळे हिंदू धर्मातील अनेक देव-देवतांवर व रूढी-परंपरांवर त्याची श्रध्दा आहे. 'बेत' या

कथेतील इटुबा हा भाविक असून तो गळ्यात माळ घालतो, त्यामुळेच तो चोरीचपाटी करीत नाही. संद्या त्याला हाडकी हडुळकीबद्दल विचारतो तेव्हा इटुबा म्हणतो, ''त्याला काय बाट हाय? आपला धंदाच त्यो ! पर खान्यावक्ती माळ मातुर गळ्यातनं काढून ठिवतो, बरंका!''[3] इटुबा दलित आहे. म्हणून त्यांच्या कुटुंबात दारिद्र्य आहे. पोट भरण्यासाठी तो जनावरांचे मांस खातो; परंतु तो भाविक असल्यामुळे ते खाताना आपल्या गळ्यातील माळ काढून ठेवतो. यावरून तो आध्यात्मिक वाटतो. तो आध्यात्मिक मूल्ये घेऊन जगतो. म्हणूनच पाप-पुण्याच्या  कल्पनाही तो मानतो. आपल्या हातून विटाळ होऊ नये, बाट होऊ नये यासाठी तो जपत असतो. 'न्याय' या कथेतील दलित असलेला हऱ्या मांग सवर्ण सताच्या शेतीतील पिकात पहाटेच्या वेळी चोरून कालवड चारतो. याबद्दल गावातील कारभारी मंडळी त्याला विचारतात; परंतु तो हे कबूल करीत नाही. तो लेकरांची शपथही खातो, नंतर नामज्या रामोशी त्याला मारूतीची पायरी शिवून परमान करायला सांगतो. तेव्हा मात्र तो पायरी शिवत नाही. उलट गुन्हा कबूल करून माफी मागतो. या त्याच्या वर्तनातून त्याची आध्यात्मिकता व्यक्त होते. तो आपला गुन्हा लपविण्यासाठी स्वत:च्या मुलाची शपथ घेतो त्याची पर्वा करीत नाही; परंतु मारूतीची पायरी मात्र शिवत नाही. पोटच्या मुलापेक्षा मारूतीवर त्याची भक्ती अधिक आहे. म्हणून पायरीला स्पर्श करून खोटे बोलण्यासाठी त्याचे धैर्य होत नाही. हऱ्या मांगाचे आध्यात्मिक अधिष्ठान व त्याची ईश्वरविषयक श्रध्दा या कथेतून व्यक्त झाली आहे.

दलित समाजाच्या देव-देवतांवरील आध्यात्माचे व भक्तीचे चित्रण 'विपरीत घडले नाही' या कथेतूनही आले आहे. रामुशवाडीची दहा-वीस घरे होती. रामूशवाड्याच्या एका कडेला यल्लमा देवीचा वाटोळा जग ठेवला होता आणि त्याच्याभोवती तांबडीभडक नवीकोर धांदोटी गुंडाळलेली होती. देवीपुढे देवीची जोगतीण असलेली बहिणा महारीण हिरवीगार चिरडी नेसून बसली आहे. बाकीची रामोशी मंडळीही या देवीपुढे बसली आहे. ही सर्व रामोशी मंडळी यल्लमा देवीची भक्त आहेत व बहिणा महारीण तर या देवीची जोगतीणीच आहे. या कथेतील वातावरणही आध्यात्मिक स्वरूपाचे आहे. दलित समाजाची यल्लमा देवीवर असलेली निष्ठा या कथेतून व्यक्त होते. 'धनाजी' या कथेत धनाजीचे व आदिवासी समाजाच्या समस्यांचे व संस्कृतीचे चित्रण करताना लेखकांनी आदिवासींची आध्यात्मिकताही व्यक्त केली आहे. दलित समाजाच्या आध्यात्मिक मूल्यांचे व भक्तीचे जिवंत चित्रण करणारी कथा म्हणजे 'वारी'. या कथेतील अर्जुना हा दलित असून तो आता थकला आहे. तो आजन्म देवाचा व पंढरीचा भक्त आहे. पंढरपूर या तीर्थक्षेत्रावर आणि तेथील देवांवर त्याची निष्ठा आहे. म्हणूनच त्याला वृध्दापकाळात मृत्युपुर्वी पंढरीला जाऊन देवदर्शन घेण्याची इच्छा आहे. तो पंढरीला जातो, नदीत आंघोळ करतो. भक्तिभावाने तो नामदेव, जनी यांना डोळे भरून पाहातो. दलित असल्यामुळे तो मंदिरात जात नाही. त्याचे मन पाप-पुण्याच्या कल्पनांनी भरलेले आहे. त्याची पाप-पुण्याची कल्पना त्याच्या आध्यात्मिक जीवनाची द्योतक आहे. अर्जुनाचा देवभोळेपणाही या कथेतून व्यक्त होतो. दलितांच्या देवनिष्ठेचे अत्यंत जिवंत चित्रण करणारी ही कथा आहे. अस्पृश्य मांग, महार आणि रामोशी या दलित जातींबरोबरच आदिवासी भटक्या समाजाच्या जीवनातील आध्यात्माचे व देवनिष्ठपणाचे चित्रण काही कथांमधून आले आहे. वर वर्णिलेल्या 'धनाजी' कथेतील आदिवासीच्या जीवनाबरोबरच 'पारधी' या कथेतून पारधी समाजाच्या आध्यात्मिक जीवनाचे चित्रण आले आहे. कमरेभोवती चार हात फडके गुंडाळणे, सर्वांनी लंगोटी वापरणे हा त्यांच्या जातीचा रिवाज आहे. तो एका श्रध्देच्या भावनेतूनच आलेला आहे. केस राखून पाठीवर सोडणे हाही या जातीचा रिवाज आहे, हे केस देवाच्या नावाने राखले जातात. हा देव कोणता? हे निवेदकाने विचारले असता पारधी असलेला बंदरी भवानी आई देवीचे नाव सांगतो. पारधी जातीत आध्यात्मिक जीवनातून व श्रध्देतून निर्माण झालेल्या काही परंपरा व भवानी आई देवीवरील भक्तीचे अत्यंत जिवंत चित्रण आले आहे. गावोगाव भटकत फिरणाऱ्या पारधी जातींनाही देव-देवता आणि आध्यात्मिक मूल्ये आहेत. अशा विविध कथांमधून दलितांतील ईश्वरविषयक निष्ठेचे व भक्तीचे आणि दलितांच्या आध्यात्मिक जीवनाचे चित्रण घडते. भारतातील दलित समाज हजारो वर्षांपासून हिंदूच होता व इतर भटके समाजही या धर्माशी संबंधित होते. म्हणून या विविध घटकांवर हिंदू धर्मातील विविध देव-देवता आणि धार्मिक रूढी, समजुती यांचा प्रभाव असलेला दिसून येतो.लोकशाहीमुळे काळाच्या ओघात दलित समाजातील ईश्वरविषयक कल्पना व त्यावरील श्रध्दा या काही प्रमाणात कमी झाल्या असल्या तरी व्यंकटेश माडगूळकर कथालेखन करीत होते, त्या काळातील दलित समाजात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराचा प्रचार पुरेपूर

पोहोचला नव्हता. त्यामुळे काही दलित समाजात हिंदू धर्मातील देव-देवतांबद्दलच्या निष्ठा व श्रध्दा होत्या. तत्कालीन दलित समाजाच्या आध्यात्मिक जीवनाचे चित्रण लेखकांनी काही कथांमधून केले आहे.

दलितांमध्ये अनेक आदर्श मूल्ये आहेत. दलितांच्या अंगी असलेले शौर्य, धैर्य आणि निर्भीडपणा हाही या आदर्श मूल्यांचाच एक भाग आहे. भारतातील दलित जातींना दुर्बल व बुध्दिहीन समजून त्यांना हीन लेखले गेले; परंतु मानवाने हीन ठरविलेल्या या दलित समाजातील व्यक्तींमध्ये शौर्य, शक्ती, सामर्थ्य आणि वीरत्व हे आदर्श गुण निसर्गाने उपजतच दिले होते. म्हणून दलित जातीतील अनेक माणसे शूर, वीर, धैर्यवान आणि शक्तिशाली असतात. दलितांच्या या शौर्याचे, धैर्याचे व शक्तीचे दर्शन व्यंकटेश माडगूळकरांच्या अनेक कथांमधून घडते 'काय सुदीक गेलं न्हाई' या कथेत बाबालालच्या घरी चोरी होते. बाबालालला चोर मारतात, तेव्हा गावातील सर्व लोक घराची दारे लावून घरात बसलेली असतात, बाहेर येण्याची हिंमत कोणीही करीत नाही. तेव्हा रामोशीच ही हिंमत करतात. हातात काठ्या, कुऱ्हाडी घेऊन ते धावत येतात. रामोशी हे गावकामगार असून गावाची राखण करणे व चोरीचा माग काढणे हे काम त्यांना करावे लागे. हे काम करत असताना ते अत्यंत प्रामाणिकपणे करतात. त्यात कुचराई करीत नाहीत. एवढेच नाही तर हे काम करतानाते मरणालाही भीत नाहीत. असे शक्तिशाली, धैर्यवान असलेले हे रामोशी दलित समाजातील आहेत. या कथेतील रामोशाच्या व्यक्तिचित्रणातून रामोशाचे शौर्य व धारिष्ट व्यक्त होते. गावकुसाबाहेरील महार, रामोशी, मांग हे सर्व अस्पृश्य दलित निर्भीड वृत्तीचे असून ते धैर्यवान व शूर आहेत. व्यंकटेश माडगूळकरांच्या कथांमधून या जातीतील काही व्यक्तींच्या शिकारीचा अनुभव व्यक्त झाला आहे. त्या शिकारी तर अत्यंत प्रभावी आहेतच तसेच ती शिकार करताना ते निर्भीडपणे व धैर्याने करतात. गावाशी व गावगाड्याशी संबंधित असलेल्या या विविध दलित जातींबरोबरच आणि दलित जातीतील शौर्याबरोबरच गावोगाव भटकंती करणाऱ्या विविध भटक्यांच्या शौर्याचेही चित्रण माडगूळकरांच्या कथेतून आले आहे. 'गोविंदा कातकरी' या कथेतील गोविंदा हा कातकरी जातीतील असून तो उत्तम शिकारी आहे. ही शिकार करताना तो आपले कसब वापरतो. त्याच्या तारुण्यात तो काटेरी जाळकटाच्या डबक्यामध्ये शिरून हिमतीने डुकराची शिकार करतो. तो निर्भीड आणि शूर आहे. कातकरी समाजाच्या शौर्याबरोबरच गोविंदा कातकऱ्याच्या माणुसकीचेही दर्शन या कथेत घडते. तो कातकरी असला, शिकारी असला तरीही माणुसकी हा त्याच्यातील एक गुणच आहे. त्याच्यातील माणुसकीमुळेच तो पुण्याहून शिकारीसाठी येणाऱ्या लोकांना नीट वागवतो. या चित्रणातून व्यंकटेश माडगूळकरांनी त्याच्यातील माणुसकी मूल्यांचे दर्शन घडविले आहे. भटक्या विविध जाती-जमातीतील या पुरुषांच्या शौर्याबरोबरच त्यांच्या काही कथांमधून भटक्यांच्या स्त्रियांतील शौर्याचे व स्वाभिमानाचे चित्रण घडते. 'असलं लई बघितल्यात' या कथेतील सवर्ण असलेला भगवंता आपल्या गावात उतरलेल्या गाढवी सोनाराच्या एका तरुण मुलीला हेरतो आणि तिच्याशी लगट करण्याचा प्रयत्न करतो. तिचा स्वाभिमान जागा होतो व ती भगवंताचे कोयत्याने नाक कापते. येथे गाढवी सोनाराच्या मुलीचा निर्भिडपणा व शूरपणा तर व्यक्त होतोच; परंतु भटक्यांच्या स्त्रियांमधील स्वाभिमानी वृत्तीचेही दर्शन घडते. भटके असलेल्या स्त्रियांमध्येसुध्दा अतिउच्च दर्जाचा स्वाभिमान आहे. ते भटके असले, दुर्बल असले तरी स्वाभिमानी आहेत. अब्रूला जपणारी ही स्त्री काही मूल्ये घेऊन जगणारी आहे. या कथेत स्त्रियांच्या स्वाभिमानाच्या या प्रातिनिधिक चित्रणाबरोबरच गाढवी सोनाराच्या प्रामाणिकपणाचेही दर्शन घडते. हे गाढवी सोनार कोणत्याही गावात वस्तू तयार करून देताना ते समोरच ती वस्तू तयार करतात. गावातील सोनार हे हातचलाखी करून सोने पचवितात; परंतु गाढवी सोनार मात्र प्रामाणिकपणे, हातचलाखी न करता वस्तू तयार करून देतात. अशा गाढवी सोनाराच्या प्रामाणिकपणाचे दर्शन या प्रसंगातून घडते. दलित भटक्या जातीला हीन समजून त्यांच्यावर अत्याचार केले गेले, त्यांना उपेक्षित ठेवले गेले; परंतु माणूस म्हणून ते श्रेष्ठच आहेत. धर्माने जरी त्यांना उपेक्षित ठेवले तरी निसर्गाने मात्र त्यांच्या अंगी माणसाचे विविध गुण दिले आहेत. दलित असले तरीही त्यांच्यात काही आदर्श मूल्ये आढळतात. मूल्ये घेऊन दलित समाज जगतो. गुन्हेगारी, व्यसनांध प्रवृत्तीबरोबरच त्यांच्यात माणुसकी, प्रामाणिकपणा, सज्जनपणा, शूरपणा, स्वाभिमान व नैतिकता ही आदर्श मूल्येही आहेत. व्यंकटेश माडगूळकर हे दलित समाजाचे चित्रण करताना त्यांच्यातील विविध वृत्ती, प्रवृत्ती त्यातून व्यक्त करतात. या सर्व आदर्श मूल्यांना प्रमाण मानून त्यांच्यावर निष्ठा ठेवून त्या मूल्यांप्रमाणे जगणाऱ्या दलित व्यक्ती लेखक अत्यंत जिवंतपणे चित्रित करतात. त्यांच्यातील या आदर्श गुणांमुळे त्यांच्या चित्रणला उंची प्राप्त होते. त्यांच्यातील चांगुलपणावर प्रकाश पडतो.

**निष्कर्ष :-**

१) व्यंकटेश माडगूळकरांनी दलित जीवनाचे जिवंत चित्रण केले आहे.
२) व्यंकटेश माडगूळकरांच्या कथांमधील दलित पात्रे सज्जन व प्रामाणिकपणे वागताना दिसतात.
३) व्यंकटेश माडगूळकरांच्या कथांमधील ही पात्रे आध्यात्मिक वृत्तीची आहेत. म्हणून गळ्यातील माळ काढून ते मांसाहार करतात.
४) कथांमधील दलित पात्रे शूर, वीर, निर्भीड, खंबीर, कर्तृत्ववान आहेत.
५) व्यंकटेश माडगूळकरांच्या कथांमधील दलित पात्रे सत्यासाठी संघर्ष करतात.

**संदर्भसूची :-**

१) (संपा.) गो.मा. पवार, ओझं, व्यंकटेश माडगूळकर, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, पुनर्मुद्रण, १९९४, पृष्ठ २
२) तत्रैव, पृष्ठ ४
३) व्यंकटेश माडगूळकर, 'गावाकडच्या गोष्टी', उत्कर्ष प्रकाशन, पुणे, पाचवी आवृत्ती, १९९४, पृष्ठ १२६